वसा सक्षम मातृत्वाचा
MOM-able™
फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटर
सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ४
आता मुंबई, पुणे, नाशिक या शहरात जाण्याची गरज नाही
IVF
ट्रिटमेंटने घ्या मातृत्वाचा आनंद आपल्या संगमनेरमध्ये
आजच आपली अपॉईंटमेंट बुक करा
8080 215 215
9699 327 301
दुसरा मजला, संजीवन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नाशिक-पुणे रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 37, 500/-
20 कॅरेट मणी = 1, 25, 005/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 12, 495/-
16 कॅरेट मुरणी = 1,00, 000/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८७ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । १०/०४/२०२६ । पान - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# संगमनेरमध्ये पाणीटंचाईचा कहर

## १२ हजार नागरिक टँकरवर अवलंबून



एआय फोटो

**नागरिकांना पाणी वाचण्याचे आवाहन**
**गटविकास अधिकारी**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात एप्रिलच्या सुरुवातीलाच उन्हाचा कडाका वाढू लागल्याने पाणीटंचाईची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. गावांसह वाड्या-वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. या पार्श्वभूमीवर पाण्याचा जपून आणि नियोजनबद्ध वापर करण्याचे आवाहन संगमनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी केले आहे. प्रशासनाकडून शक्य ते सर्व प्रयत्न सुरू असले तरी नागरिकांच्या सहकार्याशिवाय ही समस्या प्रभावीपणे हाताळणे कठीण असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सध्या तालुक्यातील ९ गावे, ६ गावठाण आणि १५ वाड्या-वस्त्यांतील तब्बल १२ हजार ५७६ नागरिकांना ६ टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असल्याची माहिती टंचाई कक्षाचे वरिष्ठ सहाय्यक संजय अरगडे यांनी दिली.

उन्हाची तीव्रता वाढल्याने पाझर तलाव, सिमेंट बंधारे, पारंपरिक विहिरी, बोअरवेल तसेच ओढे-नाले पूर्णपणे आटले आहेत. अनेक ठिकाणी पाण्याची पातळी खालावल्याने उपलब्ध स्रोतही निकामी ठरत आहेत. त्यामुळे दुर्गम भागांमध्ये पाण्याची टंचाई अधिकच तीव्र झाली आहे.

सध्या डोळासणे, पिंपळगाव देपा, खरशिंदे, वरवंडी, कर्जुले पठार, चौधरवाडी, कुंभारेवाडी, गुंजाळवाडी पठार आणि धादवडवाडी या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. तसेच बांबळेवाडी, कान्हेवाडी, धुमाळवाडी, माळवाडी, कनसेवाडी, दत्तवाडी, ठाकरवाडी, काठवनवाडी, कोंबडवाडी आणि ऐठेवाडी या वाड्या-वस्त्यांमध्येही टँकरने नागरिकांची तहान भागवली जात आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नवीन मागण्या देखील वाढू लागल्या आहेत. पोखरी बाळेश्वर येथील ५ वाड्या, साकूरमधील तासकरवाडी आणि अकलापूर येथील पत्र्याचीवाडी येथे टँकर सुरू करण्याचे प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविण्यात आले असून ते मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

एप्रिल आणि मे हे दोन महिने तालुक्यासाठी अत्यंत निर्णायक मानले जातात. विशेषतः पठार भागात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होते. वर्षानुवर्षे ही समस्या कायम असतानाही ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना प्रभावीपणे राबवण्यात अपयश येत असल्याने नागरिकांना दरवर्षी टँकरवरच अवलंबून राहावे लागत आहे. पाणी वाचवा, जीवन वाचवा या संदेशासह प्रशासनाने नागरिकांना जबाबदारीने पाण्याचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

# संगमनेर शहरात मोकाट जनावरांचा वाढता उपद्रव

## नागरिक, शेतकरी त्रस्त, तातडीने उपाययोजना करण्याची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शहरासह उपनगरांमध्ये मोकाट जनावरांचा संचार दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरातील मुख्य रस्ते तसेच इंदिरानगरसारख्या अरुंद गल्ल्यांमध्येही ही जनावरे पन्नास ते शंभरच्या जथ्थ्याने फिरताना दिसत आहेत. परिणामी वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रात्रीच्या वेळी तसेच सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत ही जनावरे रस्त्यांवर ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक वेळा अचानक रस्त्यावर आलेल्या जनावरांमुळे अपघात टळता टळता राहिल्याच्या घटना समोर येत आहेत. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक यांच्यासाठी ही परिस्थिती धोकादायक ठरत आहे.

दरम्यान, शहरालगतच्या शेती क्षेत्रातही या मोकाट जनावरांचा मोठ्या प्रमाणावर उपद्रव सुरू आहे. शेतकऱ्यांच्या पिकांमध्ये घुसून ही जनावरे मोठे नुकसान करत असून आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे कंबरडे मोडत आहे. जर्सी गोऱ्हे, भाकड गायी तसेच वृद्ध जनावरांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत आहे.

गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे निरुपयोगी जनावरांची संख्या वाढत असल्याचेही काही नागरिकांचे मत आहे. मात्र, यावर कोणतीही ठोस व्यवस्था नसल्याने ही जनावरे रस्त्यावरच भटकत आहेत. त्यातच काही नागरिक तथाकथित पुण्य मिळवण्याच्या उद्देशाने या जनावरांना भाकरी-चपाती खाऊ घालत असल्याने परिस्थिती आणखी बिघडत आहे. तज्ज्ञांच्या मते, हे अन्न जनावरांसाठी योग्य नसून त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. हिरवा चारा न मिळाल्याने त्यांच्या शेणातून उग्र वास येत असून परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत नगरपालिका प्रशासनाकडून अपेक्षित त्या प्रमाणात कारवाई होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. गोप्रेमी संघटनांनीही केवळ कत्तलखाने बंद करण्यापुरते मर्यादित न राहता अशा मोकाट जनावरांच्या पुनर्वसनासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी होत आहे. (पान ४ वर)

# संगमनेरमध्ये डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू

## ठाकरे गटाची आक्रमक भूमिका, दोषींना तातडीने अटकेची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील एका धक्कादायक घटनेत डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्याचा आरोप होत असून या प्रकरणावरून ठाकरे गटाची शिवसेना आक्रमक झाली आहे. संबंधित दोषी डॉक्टरांवर तात्काळ कारवाई करून अटक करण्यात यावी अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

दि. ८ एप्रिल रोजी दिलेल्या निवेदनात शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने नमूद करण्यात आले आहे की, मार्च २०२५ मध्ये दत्तात्रय दळवी यांना हृदयरोगाच्या उपचारासाठी संगमनेर येथील सोनांबेकर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र शस्त्रक्रिये दरम्यान व त्यानंतर संबंधित डॉक्टरांकडून गंभीर निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या हाताला गँगरीन झाल्याचे समोर आले. त्यानंतरही योग्य वेळी उपचार न मिळाल्याचा आरोप आहे. तसेच, डॉ. अभिजित कोरडे व डॉ. अजिंक्य सोनांबेकर यांनी रुग्णाच्या नातेवाईकांकडे पैशांची मागणी केल्याचेही निवेदनात म्हटले आहे. पैसे नसल्यास रुग्णाला दुसऱ्या रुग्णालयात हलवण्याचा सल्ला देण्यात आला.

यानंतर रुग्णाला नाशिक येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र खर्च परवडत नसल्याने पुढे घोटी येथील एसएमबीटी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. या दरम्यान अन्य डॉक्टरांकडून अप्रत्यक्षपणे सोनांबेकर हॉस्पिटलमधील उपचारात निष्काळजीपणा झाल्याचे सूचित करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. अखेरीस रुग्णाच्या किडनीवर परिणाम होऊन त्यांचा मृत्यू झाला.

या संपूर्ण प्रकरणामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून मृताच्या कुटुंबावर आर्थिक व मानसिक संकट ओढवले आहे. पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी जोर धरत आहे. शिवसेना (ठाकरे) गटाने प्रशासनाला दिलेल्या निवेदनात पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत.

संबंधित डॉक्टरांवर कोर्टाच्या आदेशानुसार तात्काळ कठोर कारवाई करावी, डॉ. अभिजित कोरडे व डॉ. अजिंक्य सोनांबेकर यांना त्वरित अटक करावी, संबंधित डॉक्टरांचा वैद्यकीय परवाना रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करावी, प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत संबंधित हॉस्पिटल सील करावे. याशिवाय, सोनांबेकर हॉस्पिटलच्या जागेवरील सर्व्हे नंबर १११/३७ मध्ये ओपन स्पेस व रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणावर तातडीने कारवाई करून दंड वसूल करावा, तसेच ती जागा नागरिकांसाठी खुली करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. (पान २ वर)

# अहिल्यानगरमध्ये भोंदूगिरीविरोधात कडक कारवाईची मागणी

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**अहिल्यानगर** - जिल्ह्यात वाढत्या भोंदूगिरीच्या प्रकरणांवर तातडीने लगाम घालावा, तसेच जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यात सध्या भोंदू बुवा-बाबांच्या माध्यमातून दैवीशक्ती, चमत्कार, ज्योतिष आणि अध्यात्माच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक केली जात आहे. अनेक ठिकाणी मानसिक व शारीरिक छळासोबतच महिलां व लहान मुलांचे शोषण होत असल्याचेही गंभीर प्रकार समोर येत आहेत. यामध्ये विविध कायद्यांचे उल्लंघन होत असूनही संबंधित यंत्रणा प्रभावी कारवाई करत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथे ‘दत्तधाम’ नावाने सुरू असलेल्या आश्रमातही आर्थिक व शारीरिक शोषणासह कायद्याचे उल्लंघन होत असल्याचा आरोप समितीने केला आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचे निवेदनात नमूद आहे.

समितीने पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत- जिल्ह्यात जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी व प्रत्येक पोलीस ठाण्यात अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष कार्यान्वित करावा. शाळा, महाविद्यालये आणि समाजपातळीवर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करण्यासाठी जनजागृती मोहिमा राबवाव्यात. भोंदूगिरी, (पान ५ वर)

ओम मयूर® ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सुवर्णस्पर्शने होईल
प्रत्येक क्षण समृद्धीचा...
अक्षय तृतीया आणि लग्नसराईसाठी खास ऑफर
दागिन्यांच्या मजुरीवर
20 ते 60 % सूट
पर्यंत भरघोस सूट!
ऑफर कालावधी: १ एप्रिल ते १८ मे २०२६
नियम व अटी लागू
सोने । चांदी । हिरे | अशोक चौक, संगमनेर. मो : 937201 2044

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
भाग्यवंत १०१ जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
अक्षयतृतीया पर्यंत १० gm २२ कॅरेट सोने बुकिंग फक्त २००० हजार मध्ये
संगमनेर मार्केटमध्ये..
२२ कॅरेट सोन्याचा दर..
३००० रुपयांपेक्षा कमी !
हो हो..३००० रुपयांनी दर कमी म्हणून आजच भेट द्या...
ऑफर फक्त 20/4/2026 पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/70661 49090

# काम करा, नाहीतर पद सोडा
## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा थेट इशारा



मुंबई (वृत्तसंस्था)

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या अधिकाऱ्यांना कडक इशारा दिला आहे की, केवळ सक्रिय नेतेच पदावर राहतील. निष्क्रिय नेत्यांना हटवले जाईल आणि संघटनेचा विस्तार केला जाईल.

मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सर्वात मोठा फेरबदल होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पक्षात, शिवसेनेत, मोठ्या 'स्वच्छता मोहिमे'चे संकेत दिले आहे. शिंदे यांनी स्पष्ट केले आहे की, जे नेते जमिनीवर काम करतात, त्यांनाच पक्षात स्थान दिले जाईल. त्यांनी स्पष्टपणे इशारा दिला आहे की, 'जे काम करतात, तेच पदावर राहतील.' उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दृष्टी आता केवळ शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. त्यांनी राज्यातील सर्व ४३,००० गावांमध्ये शिवसेनेची संघटना मजबूत करण्याचे ध्येय ठेवले आहे. नजीकच्या काळात मोठ्या निवडणुका नसल्यामुळे, शिंदे यांना या वेळेचा उपयोग पक्षाची मुळे अधिक घट्ट करण्यासाठी करायचा आहे. जोपर्यंत पक्षाचे कार्यकर्ते तळागाळापर्यंत पोहोचत नाहीत, तोपर्यंत संघटनेची ताकद अपूर्ण आहे, असे त्यांना वाटते.सूत्रांनुसार, शिंदे स्वतः मंत्री आणि आमदारांच्या कामगिरीचा अहवाल तयार करत आहे. ते केवळ घोषणांवर समाधानी नाहीत, तर पक्षाच्या विस्ताराच्या प्रयत्नांचाही आढावा घेणार आहे.

# नारी शक्ती वंदन कायद्यात सुधारणा
## महिलांना 33% आरक्षणाचा मार्ग मोकळा



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नारी शक्ती वंदन अधिनियमातील सुधारणा विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावानुसार लोकसभेच्या जागा सध्याच्या ५४३ वरून वाढवून ८१६ केल्या जातील, ज्यापैकी २७३ जागा महिलांसाठी आरक्षित असतील.

सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशन वाढवून १६ ते १८ एप्रिलपर्यंत संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे, ज्यात हे सुधारणा विधेयक मंजूर होण्याची शक्यता आहे. संसदेची मंजुरी मिळाल्यानंतर हा कायदा ३१ मार्च २०२९ पासून लागू होईल. त्याच वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुका आणि काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये तो पहिल्यांदाच प्रभावी होईल. प्रस्तावानुसार आरक्षण 'उभ्या' (र्शिींळलरश्र) आधारावर लागू होईल, म्हणजे अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षित जागांमध्येही महिलांसाठी वाटा निश्चित केला जाईल.पुनर्रचना कायद्यात सुधारणा करण्यासाठी सरकार स्वतंत्र विधेयक आणणार

राज्यांच्या विधानसभांमध्येही याच प्रमाणात जागांचे आरक्षण होईल. सरकार एका घटनादुरुस्ती विधेयकासोबतच पुनर्रचना कायद्यात सुधारणा करण्यासाठी स्वतंत्र सामान्य विधेयकही आणेल, जेणेकरून नव्याने जागा निश्चित केल्या जाऊ शकतील. नवीन जागांची निश्चिती २०२७ च्या जनगणनेऐवजी २०११ च्या जनगणनेच्या आधारावर केली जाऊ शकते. हा कायदा राज्यांच्या विधानसभांना आणि दिल्ली, जम्मू-काश्मीर, पुद्दुचेरी यांसारख्या केंद्रशासित प्रदेशांनाही लागू केला जाईल.

# अंधश्रद्धा ठरवण्याचा अधिकार न्यायालयाकडे – सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केरळमधील सबरीमाला मंदिरासह सर्व धार्मिक स्थळांवर महिलांसोबत होणाऱ्या भेदभावाशी संबंधित याचिकांवर सुप्रीम कोर्टाच्या ९ सदस्यीय संविधान पीठाने बुधवारीही सुनावणी केली. कोर्टाने स्पष्ट केले की, एखाद्या धर्मातील कोणती प्रथा अंधश्रद्धा आहे, हे ठरवण्याचा अधिकार न्यायालयाकडे आहे. दरम्यान, 'धर्मनिरपेक्ष न्यायालय या विषयावर निर्णय घेऊ शकत नाही, कारण न्यायाधीश हे कायद्याचे तज्ज्ञ असतात, धर्माचे नाहीत', असा युक्तिवाद केंद्राने केला होता.

केंद्राच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, 'कायदा करणे हे विधिमंडळाचे काम आहे. काळी जादू व अशा प्रथा रोखण्यासाठी विधिमंडळानेच कायदे बनवले आहेत.' यावर न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांनी विचारले की, 'एखादी प्रथा जादूटोण्याशी संबंधित असेल, तर तिला अंधश्रद्धा मानले जाणार नाही का? विधिमंडळ गप्प असेल तर न्यायालय सार्वजनिक सुव्यवस्था लक्षात घेऊन त्यावर बंदीचे निर्देश देऊ शकत नाही का?' यावर मेहता यांनी उत्तर दिले की, 'न्यायिक पुनर्विलोकन हे आरोग्य, नैतिकता आणि सार्वजनिक सुव्यवस्थेच्या आधारावर होऊ शकते, अंधश्रद्धेच्या आधारावर नाही.' या प्रकरणाची सुनावणी गुरुवारीही सुरू राहिल.

दिवसभराच्या सुनावणीनंतर न्यायमूर्ती नागरत्ना यांनी मेहता यांच्याकडून सबरीमाला प्रकरणातील याचिकाकर्त्यांची माहिती घेतली. युक्तिवादावरून असे वाटते की मूळ याचिकाकर्ते भक्त नाहीत. मेहता यांनी सांगितले की, 'इंडियन यंग लॉयर्स असोसिएशन' या वकिलांच्या संघटनेची ही याचिका आहे. यावर न्यायमूर्ती नागरत्ना म्हणाल्या, 'ते भक्त नाहीत. ज्याचा त्या मंदिराशी कोणताही संबंध नाही, अशी व्यक्ती जेव्हा आव्हान देते, तेव्हा न्यायालय अशा रिट याचिकेवर सुनावणी करू शकते का?

# अवैध उत्खननावर लगाम
## परवानगी अधिकार थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यभरात मोठ्या प्रमाणावर होत असलेले अवैध उत्खनन आणि नियमबाह्य स्टोन क्रशरवर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य सरकारने मोठा प्रशासकीय बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. ५०० ते २००० ब्रासपर्यंतच्या खाणकामासाठी दिल्या जाणाऱ्या परवानग्यांचे अधिकार आता स्थानिक स्तरावर न ठेवता, ते थेट जिल्हाधिकारी स्तरावर सोपविण्यात येणार आहे. यासाठी नियमामध्ये बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

आमदार सुनील प्रभू यांनी विधानसभेत याबाबत लक्षवेधी मांडली होती. त्या अनुषंगाने मंत्रालयात महसूल मंत्र्यांच्या दालनात ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातील विषयांच्या अनुषंगाने पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे कनिष्ठ स्तरावरील अधिकारी आणि खाण व्यावसायिक यांच्यातील गैरप्रकारांना चाप बसणार असून संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता येणार आहे. या बैठकीला ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाल, पालघर जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड आणि रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्यासह महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यापूर्वी कमी क्षमतेच्या (५०० ते २००० ब्रास) उत्खननासाठी तहसील किंवा प्रांत स्तरावर प्रक्रिया केली जात असे. मात्र, यात मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यावर तोडगा म्हणून महसूल मंत्र्यांनी आता हे सर्व अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नियमात आवश्यक ते बदल करण्यात येणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात यासाठी एक स्वतंत्र 'सेल' (कक्षा) स्थापन करण्यात येईल, जो वर्षातून एकदाच अर्जांची छाननी करून रीतसर परवानगी देईल.

बैठकीत मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना कडक इशारा दिला की, ज्या ठिकाणी कागदपत्रे नसतानाही खाणी सुरू ठेवण्यास मदत केली गेली आहे, अशा तहसीलदार आणि प्रांत अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्या वेतनवाढी रोखण्याचे प्रस्ताव शासनाला सादर करावेत.

# घुलेवाडी ग्रामपंचायतमध्ये महिलांचे ठिय्या आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प्रवरा नदीला पाणी नसल्यामुळे घुलेवाडी गाव आणि उपनगरात गेली १५ ते २० दिवसांपासून भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. पाण्याच्या अभावी संतप्त झालेल्या महिलांनी व ग्रामस्थांनी घुलेवाडी ग्रामपंचायतवर मोर्चा काढत कार्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या पायऱ्यांवर बसून ठिय्या आंदोलन केले.

संगमनेर शहरालगत असणाऱ्या घुलेवाडी गावासाठी मागील सहा वर्षांत सुमारे २२ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र प्रत्येक उन्हाळ्यात घुलेवाडी गावात पाणीटंचाई निर्माण होत असते जल जीवन मिशन अंतर्गत या गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी जवळपास १२० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. एवढा मोठा निधी खर्च होऊनही गावकऱ्यांना दररोज तर सोडाच, किमान दिवसा आडही पाणी मिळत नसल्याने हा कोट्यवधींचा निधी गेला कुठे? असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. वेळेवर पाणी दिले जात नाही परंतु पाणीपट्टी वेळेवर न भरल्यास दंड आकारला जातो, वेळेवर पाणी देण्याची जबाबदारी कोण घेणार? असा संतप्त सवाल राष्ट्रवादी काँग्रेस महिला तालुकाध्यक्ष वैशाली राऊत, शिवसेना शाखाप्रमुख शरद पानसरे, सिताराम पानसरे, विनायक वाडेकर, स्वरूप राऊत, रोशन कोथिंबीरे, ऋतिक राऊत, नितीन राऊत, नवनाथ राऊत, भैय्या सातपुते यांच्यासह महिलांनी उपस्थित करत तात्काळ पाणी पुरवठा करण्यासाठी टँकर सुरू करण्याची मागणी केली.

घुलेवाडी ग्रामपंचायतचे उपसरपंच दत्तात्रय राऊत व ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत क्षीरसागर, रवी गिरी, अनिल राऊत, बाजीराव पानसरे यांच्यासह ग्रामपंचायत अधिकारी यांना संतप्त झालेल्या आंदोलनकर्त्यांनी चांगलेच धारेवर धरत कोट्यावधी रुपये खर्च करून गावाला पाणी मिळत नसेल तर त्या योजनांचा उपयोग काय? जलजीवन मिशन योजनेचे काम का थांबले आहे, असा जाब विचारला. जोपर्यंत योजना पूर्ण होत नाही तसेच नदीला पाणी येत नाही, तोपर्यंत ग्रामपंचायत प्रशासनाने पाणी पुरवठा करण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी अशी मागणी केली. घुलेवाडीतील आंदोलनाची माहिती मिळताच संगमनेर पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी राजेंद्र ठाकूर व पाणी टंचाई विभाग प्रमुख संजय आरगडे यांनी आंदोलन स्थळी भेट दिली. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून ग्रामपंचायत प्रशासनाला तातडीने पाणीपुरवठा सुरू करण्याबाबत काय उपाययोजना करता येतील याबाबत सूचना दिल्या.

### जल जीवन कामावर प्रश्न उपअभियंत्यांची टाळाटाळ

घुलेवाडी गावाला पाणीपुरवठा होत नसल्यामुळे ग्रामपंचायतवर मोर्चा येणार असल्याची माहिती देऊनही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे अधिकारी वेळेत पोहोचले नाहीत. आंदोलन सुरू होऊन एक ते दीड तास उलटूनही अधिकारी न आल्याने ग्रामस्थांचा पारा चढला. जोपर्यंत जीवन प्राधिकरणचे अधिकारी येत नाही तोपर्यंत हे आंदोलन मागे घेणार नाही असा पावित्रा आंदोलनकर्त्यांनी घेतला. काही वेळाने कनिष्ठ स्तरावरील अधिकारी आले मात्र आंदोलकांनी विचारलेल्या प्रश्नांना तर त्यांची बोलतीच बंद झाली त्यानंतर गाडीत बसलेल्या जीवन प्राधिकरणच्या उपअभियंता थिटे आंदोलनस्थळी दाखल झाल्या. आंदोलनकर्त्यांनी जलजीवनचे काम कधी पूर्ण करणार असे विचारले असता त्यांनाही समर्पक उत्तरे देता आली नाही. माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नाला सुद्धा त्यांनी जाणीवपूर्वक उत्तरे दिली नाहीत.

# अकोले पंचायत समितीसमोर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे शुक्रवारपासून कामबंद आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनच्या अकोले शाखेच्या वतीने १० एप्रिल २०२६ पासून बेमुदत कामबंद व अकोले पंचायत समितीसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. किमान वेतन जमा झालेले असतानाही पंचायत समिती प्रशासनाकडून ते देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप युनियनचे तालुकाध्यक्ष संदीप घोडके आणि सचिव संतोष नाईकवाडी यांनी केला आहे.

युनियनच्या प्रसिद्धी पत्रकानुसार प्रशासनाला निवेदने देऊन व अधिकाऱ्यांसोबत बैठका होऊनही अनेक प्रश्न सुटलेले नाहीत. भविष्य निर्वाह निधीचे खाते अद्ययावत करणे, किमान वेतनाप्रमाणे वेतन देणे, सुधारित दराप्रमाणे राहणीमान भत्ता अदा करणे, कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत करणे आणि कर वसुलीची अट रद्द झाल्याने देय असलेल्या ५० ते ७५ टक्के वेतनातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम दर महिन्याला भरणे या मागण्या अद्याप प्रलंबित आहेत.

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने २७ मार्च २०२६ रोजी पत्र क्र. १०५/२०२६ अन्वये गटविकास अधिकाऱ्यांना प्रलंबित कामकाजाबाबत केले आहेत. तरीही गटविकास अधिकाऱ्यांनी ठोस निर्णय न घेतल्याने आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भातील निवेदन अकोले गटविकास अधिकारी, अहमदनगर उपमुख्य कार्यकारी अधिकारी, युनियनचे जिल्हाध्यक्ष आणि पोलीस निरीक्षकांना देण्यात आले आहे.

सदर निवेदनावर युनियनचे तालुकाध्यक्ष संदीप घोडके, सचिव संतोष नाईकवाडी, उपाध्यक्ष तुकाराम कडाळी व कार्याध्यक्ष संतोष कोटकर यांच्या सह्या आहेत. या आंदोलनात कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पांडुरंग चासकर, गणेश माताडे, उत्तम शेटे व सुयोग कर्पे आदींनी केले आहे.


दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

**वाढदिवस शुभेच्छा...**



संगमनेर बसस्थानकातील गणेश टेलर्सचे संचालक दत्तात्रय परबत यांचा वाढदिवस श्री गणेश टेलर दुकानाचा 7 वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, युवा व्याख्यते निलेश पर्बत यांच्यासह मित्रपरिवार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


पान १ वरून -

### संगमनेरमध्ये डॉक्टरांच्या....

दरम्यान प्रशासनाने या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या वेळी उपजिल्हाप्रमुख अमर कतारी, शहरप्रमुख अमित चव्हाण, फैसल सय्यद, जिल्हासंघटक रंगनाथ फंटागरे, तालुकाप्रमुख भाऊसाहेब हासे, भिमाशंकर पावसे, दीपक साळुखे, रविंद्र कानकाटे, अमोल डुकरे, इम्तियाज शेख, अशोक बढे, शितल हासे यांच्यासह अनेक पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक व महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

सदर प्रकरणामुळे संगमनेरमध्ये वैद्यकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या घटनेने अकोलेसह संगमनेर शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# अमृतवाहिनीमध्ये राष्ट्रीय पातळीवर इंडस्ट्री प्रायोजित 'एक्सकॅलिबर- 4.0' रोबोटिक्स टेक फेस्टचे आयोजन




**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**संगमनेर** - संगमनेर येथील अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ऑटोमेशन अँड रोबोटिक्स विभाग व स्टुडंट असोसिएशन ऑफ ऑटोमेशन अँड रोबोटिक्स 'अभियांत्रिकी विभागामार्फत राष्ट्रीय स्तरावरील इंडस्ट्री प्रायोजित एक्सकॅलिबर-४.०' या भव्य टेक्निकल फेस्टचे आयोजन करण्यात आले आहे.

हा टेक फेस्ट दिनांक '१० एप्रिल २०२६' व '११ एप्रिल २०२६' या दोन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आलेला आहे. हा टेक फेस्ट दर दोन वर्षानी आयोजित केला जातो. ज्यामध्ये देशभरातील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा अत्स्फूर्त सहभाग असतो. विशेष म्हणजे हा कार्यक्रम विद्यार्थ्यांकडून आणि विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला जात आहे. या टेक फेस्टला IEEE, IEI या नामांकित संस्थांकडून तांत्रिक प्रायोजकत्व लाभले आहे, ज्यामुळे कार्यक्रमाची गुणवत्ता आणि व्याप्ती अधिक उंचावली आहे.

सदर टेक फेस्टची सर्व माहिती www.excalibure4.co.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या कार्यक्रमासाठी नोंदणी ऑनलाइन सुरू असून दिलेली लिंक हीच अधिकृत नोंदणी लिंक आहे.

'एक्सकॅलिबर-४.०' या टेक फेस्ट अंतर्गत रोबोवॉर, पेपर प्रेझेंटेशन, रोबो सॉकर, रोबो रेस, रोबो इनोव्हेटर्स, रोबो हॅकाथॉन, CAD वॉर, पोस्टर प्रेझेंटेशन, ई-स्पोर्ट्स, रील मेंकिग कॉम्पिटिशन इ. या टेक फेस्टसाठी विविध ऑटोमेशन आणि रोबोटिक्स क्षेत्रातील (RUSHAS Enggineering, Urja IIT Academy, NANDINI Engineers, VARADOM, i INFINITY solution infinite. त्याचबरोबर दैनिक युवावार्ता इत्यादी कंपन्यांनी प्रयोजकत्व दिलेले आहेत.

या टेक फेस्टसाठी संस्थेच्या विश्वस्त शरयुताई देशमुख, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनील शिंदे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश व विभाग प्रमुख डॉ. विलास शिंदे तसेच कार्यक्रम व्यवस्थापक प्रा. हेमंत पठाडे व विभागातील सर्व शिक्षक वृंद कर्मचारी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# अभिषेक कळमकरविरुद्ध आणखी एक अत्याचाराचा गुन्हा



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगरचे माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर याच्याविरुद्ध महिलेवर अत्याचार केल्याचा आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. फकीरवाडा परिसरातील एका तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या तरुणीने म्हटले आहे की, लोकसभा निवडणुकीच्या प्रचार काळात आपली कळमकर यांच्या सोबत ओळख झाली. त्यानंतर त्याने आपल्याला नोकरीचे आमिष दाखविले त्यासाठी भिंगार कॅम्प परिसरातील नगर क्लब जवळ बोलाविले. तेथे पाण्यातून गुंगीचे औषध देऊन अत्याचार केला. त्याचे व्हिडीओ तयार केले. हा प्रकार कोणाला सांगू नको, अन्यथा व्हिडीओ व्हायरल करील अशी धमकी दिली. मी जेव्हा बोलाविल, जेव्हा बोलाविल तेव्हा यायचे, असेही आरोपीने धमकावल्याचे फिर्यादित म्हटले आहे.

कळमकर याच्याविरुद्ध या पूर्वीही एका महिलेवर अत्याचार केल्याचा गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल आहे. तिलाही शाळेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून अत्याचार केल्याचा आरोप आहे. या गुन्ह्यात कळमकर याचा अटकपूर्व जामीन फेटाळण्यात आला आहे. सध्या तो फरार आहे. न्यायालयाने त्याच्याविरुद्ध स्टँडिंग अटक वॉरंट काढले आहे. मात्र पोलिसांना तो अद्याप सापडला नाही. त्यामुळे पोलिसांना तो सापडत नाही की त्यांच्यावर कोणाचा दबाव आहे, अशी शंका व्यक्त होऊ लागली आहे.

कळमकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नगर शहरातून विधानसभा निवडणूक लढविली होती. आमदार संग्राम जगताप यांनी त्यांचा पराभव केला होता. कळमकर यांच्याकडे पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष पद आहे. त्यांच्याविरुद्ध आता अत्याचाराचे दोन गुन्हे दाखल झाले आहेत. त्यात ते फरारी आहेत. त्यामुळे पक्ष काय भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.












# भाजपा प्रदेश माध्यम प्रमुखपदी गोविंद येतयेकर तर सह माध्यम प्रमुखपदी ओम प्रकाश चौहान



मुंबई (प्रतिनिधी)-

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेशच्या माध्यम प्रमुखपदी श्री गोविंद येतयेकर यांची, तर सह माध्यम प्रमुखपदी ओम प्रकाश चौहान यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत श्री गोविंद येतयेकर व श्री ओम प्रकाश चौहान यांना संघटनात्मक नियुक्तीचे पत्र देण्यात आले. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपचे सरचिटणीस राजेश पांडे, सरचिटणीस सुनील राणी, भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष कृष्णराज महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.

गोविंद येतयेकर हे एक पत्रकार आणि महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आहेत. यापूर्वी प्रबोधन, गोरेगावचया कार्यकारिणीत देखील सक्रिय होते. पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रात कार्य आहे. ओमप्रकाश चौहान हे भाजपाचे जुने कार्यकर्ते असून माध्यम विभागात अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपची माध्यम व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर काटेकोर लक्ष ठेवा – खर्च निरीक्षक व्ही. कुमार

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांनी निवडणुकीसाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे सक्तीचे असून, बँकांमधील दहा लाख रुपयांपेक्षा जास्त संशयास्पद व्यवहारांची माहिती थेट प्राप्तिकर विभागाला देणे बंधनकारक असल्याचे निर्देश खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी दिले. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने खर्च, माध्यम व उत्पादन शुल्क विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी बाबासाहेब घोरपडे, उत्पादन शुल्क अधीक्षक प्रमोद सोनोने, ऋषिकेश इंगळे, अग्रणी बँकेचे अधिकारी आशिष नवले, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील तसेच माहिती अधिकारी अमोल महाजन उपस्थित होते.

व्ही. कुमार म्हणाले, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची नियमित तपासणी केली जाणार आहे. प्रत्येक तपासणीदरम्यान किमान तीन दिवसांचे अंतर असणे आवश्यक असून, त्यानुसार १५, १८ आणि २१ एप्रिल रोजी खर्च तपासणी निश्चित करावी. तपासणीवेळी उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित नसल्यास त्यांना रीतसर नोटीस पाठवून कळविण्यात यावे. तसेच अंतिम उमेदवारांची यादी तयार करून त्यांच्या खर्चाचा तपशीलवार



अहवाल खर्च पथकाने नियमानुसार तयार करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

माध्यम प्रमाणन व नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी तसेच समाजमाध्यमांवर बारकाईने लक्ष ठेवावे. 'पेड न्यूज'ची सखोल तपासणी करून जाहिरात खर्चाचे अहवाल वेळेत सादर करावेत. याशिवाय 'सी-व्हिजिल' प्रणालीवर प्राप्त होणाऱ्या नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कारवाई करावी, असे निर्देश त्यांनी दिले. एक खिडकी योजनेअंतर्गत उमेदवारांना वाहन व प्रचार फेऱ्यांसाठी परवानग्या देण्याची प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी. प्रचार सभेस परवानगी घेऊनही सभा झाली नसल्यास त्याची खातरजमा करावी. प्रचार फेऱ्या व सभांचे चित्रीकरण करण्यासाठी व्हिडिओ निरीक्षण पथके कार्यरत असून, त्यांच्या माध्यमातून नियमित अहवाल संकलित करावेत.

पोलीस विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच भरारी पथकांनी मतदारसंघ व परिसरातील अवैध धंद्यांवर कारवाई करावी. संबंधित पथकांनी दररोजच्या कारवाईचे अहवाल अद्ययावत ठेवून एकत्रित अहवाल वेळेत सादर करावा. सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या पारदर्शकपणे आणि काटेकोरपणे पार पाडाव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# निवास सुविधांची अधिकृत नोंदणी करा - पर्यटन संचालनालय

अहिल्यानगर
(जिल्हा माहिती कार्यालय)-

राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालयामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर पर्यटन व्यवसायाशी संबंधित मालक, उद्योजक व नागरिकांनी होमस्टे, पर्यटन अपार्टमेंट्स, पर्यटक बंगले व वसतिगृहे आदी निवास सुविधांची अधिकृत नोंदणी करावी, असे आवाहन पर्यटन संचालनालयाच्या नाशिक येथील उपसंचालकांनी केले आहे.

पर्यटकांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार निवास सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, या उपक्रमामुळे पर्यटकांना स्थानिक संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलीचा जवळून अनुभव घेता येणार आहे. विविध निवास पर्यायांमुळे पर्यटकांचा अनुभव अधिक समृद्ध होण्यास मदत होणार आहे.

नोंदणीकृत निवास सुविधांना 'पर्यटन मान्यता प्रमाणपत्र' प्रदान करण्यात येते. त्यामुळे पर्यटकांचा विश्वास वृद्धिंगत होतो. तसेच शासनाने निश्चित केलेल्या मानकांनुसार सुविधा उपलब्ध केल्याने सुरक्षितता, स्वच्छता व गुणवत्ता यामध्ये वाढ होते. नोंदणीमुळे संबंधित व्यावसायिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेता येणार आहे.

आगामी काळात वाढणाऱ्या पर्यटनाच्या पार्श्वभूमीवर अधिकृत निवास सुविधांची गरज वाढणार असून, नोंदणीकृत होमस्टे व इतर सुविधांमुळे पर्यटकांना विश्वासार्ह निवास उपलब्ध होईल. यासोबतच स्थानिक नागरिकांसाठी रोजगार व उत्पन्नाच्या संधीही निर्माण होणार आहेत.

आपल्या निवास सुविधांची नोंदणी करून महाराष्ट्राच्या पर्यटन विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी 'उपसंचालक कार्यालय, पर्यटन भवन, शासकीय विश्रामगृह आवार, गोल्फ क्लब मैदानाजवळ, नाशिक' येथे संपर्क साधावा. तसेच

*www.maharashtratourism.gov.in* या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा ८३९०७३१७३७, ०२५३-२९९५४६४ या दूरध्वनी क्रमांकांवर अथवा ddtourism.nashik-mhgov.in या ईमेलवर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# अॅड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात कुस्ती मल्लांची निवड चाचणी



राजूर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

भारतीय खेल प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्यावतीने दि. २४ एप्रिल २०२६ रोजी राजूर येथील सत्यनिकेतनचे ड. एम. एन. देशमुख महाविद्यालयात १४ वर्षाखालील कुस्ती मल्लांची निवड चाचणी संपन्न होणार आहे. या निवड चाचणीसाठी दिल्लीहून तज्ञ कुस्ती कोच मा. भोलानाथ पाल निवड चाचणी घेण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

या निवड चाचणीमध्ये जे कुस्ती मल्ल निवडले जातील, त्यांना दरमहा एक हजार रुपये मानधन व दरवर्षी स्पोर्ट्स किट देण्यात येणार आहे. तसेच या निवड झालेल्या कुस्ती मल्लांना साई कुस्ती केंद्राचे कोच, आंतरराष्ट्रीय पदक विजेते तानाजी नरके यांच्याकडून कुस्ती प्रशिक्षण मिळणार आहे.

तरी अकोले व संगमनेर तालुका परिसरातील सर्व कुस्ती मल्लांनी या निवड चाचणीसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे व या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. भाऊसाहेब देशमूख व साई कुस्ती कोच तानाजी नरके यांनी केले आहे.

# पुणे हादरले! महिला प्राचार्याकडून ७ लाखांची खंडणी

## 'रील स्टार' महिला पोलिसासह तिघांवर गुन्हा



पुणे (प्रतिनिधी)-

जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या खाकी वर्दीवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. एका नामांकित शैक्षणिक संस्थेच्या महिला प्राचार्याला ब्लॅकमेल करून तब्बल ७ लाखांची खंडणी उकळल्याप्रकरणी तीन पोलीस कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यामुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी अमितेश कुमार यांनी तात्काळ दखल घेत, कडक कारवाईचे आदेश दिले आहेत. आरोपींमध्ये पोलीस उपनिरीक्षक अजित बडे, दामिनी मार्शल म्हणून कार्यरत आणि सोशल मीडियावर 'रील स्टार' म्हणून ओळख असलेली सोनाली हिंगे, तसेच सुदाम तायडे यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या तिघांनी संगनमताने महिला प्राचार्याला जाळ्यात ओढले. तुमच्यावर पॉक्सो क्ट अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल होऊ शकतो, अशी भीती दाखवत, अटक आणि बदनामीची दहशत निर्माण करण्यात आली. या भीतीपोटी प्राचार्यांकडून ७ लाखांची रक्कम उकळण्यात आली. मात्र, हा प्रकार संशयास्पद वाटल्याने संबंधित प्राचार्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे धाव घेतली. तक्रार मिळताच पोलीस आयुक्तांनी चौकशीचे आदेश दिले. प्राथमिक चौकशीत पोलिसांचा सहभाग स्पष्ट झाल्यानंतर बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणात विशेष म्हणजे, सोशल मीडियावर 'रील स्टार' म्हणून प्रसिद्ध असलेल्या महिला पोलीस कर्मचाऱ्याचा सहभाग उघड झाल्याने प्रकरणाची चर्चा अधिकच रंगली आहे. सामान्य नागरिकांच्या संरक्षणासाठी नेमलेले पोलीसच वर्दीचा गैरवापर करून खंडणी उकळत असतील, तर खाकीवरील विश्वास डळमळीत होणे साहजिक आहे. या घटनेमुळे पुणे पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली असून, दोषींवर नेमकी काय कारवाई होणार, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# जागतिक आरोग्य दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये जनजागृती कार्यक्रम



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

सात एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर येथे हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला हॉस्पिटलमधील सर्व डॉक्टर, नर्सिंग स्टाफ तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान आरोग्याविषयी जनजागृती, निरोगी जीवनशैलीचे महत्त्व आणि नियमित आरोग्य तपासणीची गरज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सेंटर हेड डॉ. स्नेहल गायके यांनी उपस्थितांना मौल्यवान मार्गदर्शन करत, निरोगी समाज हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे, असे सांगत सर्वांनी आपल्या आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले.

तसेच येत्या १९ एप्रिल रोजी होणाऱ्या वर्ल्ड लिव्हर डेच्या पार्श्वभूमीवर डॉ. सागर हासे नेफ्रॉलॉजिस्ट यांच्या हस्ते विशेष लिव्हर स्क्रीनिंग पॅकेज आजपासून सुरू करण्यात आले. या पॅकेजमध्ये खालील तपासण्यांचा समावेश आहे : लिव्हर फंक्शन टेस्ट (एलएफटी), युरिक सिड, फास्टिंग ब्लड शुगर (एफबीएस), एचबीएसएजी (हेपॅटायटिस बी स्क्रीनिंग), अल्ट्रासाऊंड सोनोग्राफी (अॅब्डॉमेन), लिपिड प्रोफाइल, हेपॅटायटिस बी व्हॅक्सीन (डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार), लिव्हर स्पेशालिस्ट कन्सल्टेशन.

या संपूर्ण पॅकेजची विशेष किंमत फक्त २०००/- ठेवण्यात आली आहे. यावेळी डॉ. स्नेहल गायके यांनी प्रिव्हेंटिव्ह हेल्थ चेकअप (प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी)चे महत्त्व अधोरेखित करत, नागरिकांनी वेळोवेळी तपासणी करून आपले आरोग्य जपावे, असे आवाहन केले.

मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे रुग्णसेवा अधिक प्रभावीपणे देण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. तसेच संगमनेर तालुक्यातील नागरिकांनी या विशेष पॅकेजचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व डॉक्टर, कर्मचारी व व्यवस्थापन यांचे विशेष योगदान राहिले.

# संगमनेरमध्ये वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठानचा शुभारंभ



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-

शहरातील वैदिक पुरोहित समाजासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत, वैदिक पुरोहित बहुउद्देशीय प्रतिष्ठान, संगमनेर या संस्थेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रतिष्ठित व्यावसायिक शिरीष मुळे यांनी भूषविले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विजय नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन पराग सराफ, तसेच वेदमूर्ती बापू मुळे गुरूजी उपस्थित होते. याशिवाय वेदमूर्ती अरविंद उपासनी गुरूजी, वेदमूर्ती अनिल मुळे गुरूजी व वेदमूर्ती गिताराम मुळे गुरूजी यांनी अतिथी म्हणून कार्यक्रमास उपस्थिती लावली.


कार्यक्रमाची सुरुवात विधिवत दीपप्रज्वलन व वैदिक मंत्रोच्चाराने करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या स्थापनेचे स्वागत करत, पुरोहित समाजाच्या एकतेची गरज अधोरेखित केली. संस्थेचे अध्यक्ष कैलास जोशी गुरूजी यांनी आपल्या मनोगतात संस्थेच्या स्थापनेमागील उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, पुरोहितांचे संघटन, त्यांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण तसेच धर्मसंस्कृतीचे जतन व संवर्धन या उद्दिष्टांसाठी संस्था कार्यरत राहणार आहे. प्रमुख पाहुण्यांनी संस्थेच्या उपक्रमांचे कौतुक करत, भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव डॉ. वैभव उपासनी गुरूजी यांनी प्रभावीपणे केले, तर पाहुण्यांचा परिचय उपाध्यक्ष चेतन मुळे गुरूजी यांनी करून दिला. आभार प्रदर्शन उपसचिव प्रमोद जोशी गुरूजी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी त्रृषिकेश मुळे गुरूजी, स्वप्निल मुळे गुरूजी, समीर सराफ गुरूजी, ओंकार मुळे गुरूजी, संदीप मोहोळे गुरूजी, उत्कर्ष जोशी गुरूजी, महेश सांबरे गुरूजी, गोकुळ कुलकर्णी गुरूजी यांसह सर्व पुरोहित बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...

# ‘नो मोबाइल’चा प्रयोग नव्या पिढीसाठी संजीवनी

आधुनिक युगात तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणले असून दिवाणखान्यातील टीव्ही आणि हातातील मोबाइल हे जीवनशैलीचे अविभाज्य घटक बनले आहेत, मात्र या साधनांच्या अतिरेकी वापरामुळे निर्माण होत असलेल्या सामाजिक, मानसिक आणि कौटुंबिक समस्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही, हे वास्तव आता अधिक ठळकपणे समोर येत आहे, त्यामुळेच महाराष्ट्रातील धाराशिव जिल्हा प्रशासनाने सायंकाळी सात ते नऊ या कालावधीत ‘नो टीव्ही, नो मोबाइल’ हा उपक्रम राबवण्याचा घेतलेला निर्णय हा केवळ प्रशासनिक आदेश नसून समाजाला दिशादर्शक ठरणारा प्रयोग म्हणून पाहण्याची गरज आहे, यापूर्वी कर्नाटकातील हलगा आणि अथणी तालुक्यातील वडगाव या गावांनीही अशाच प्रकारे सामूहिक निर्णय घेत तंत्रज्ञानापासून काही काळ दूर राहण्याचा प्रयत्न केला आहे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसारख्या देशांनी अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध घालण्याचे धोरण स्वीकारले आहे, यावरून डिजिटल माध्यमांचा अतिरेक हा केवळ भारतापुरता मर्यादित नसून जागतिक चिंतेचा विषय बनला आहे, तंत्रज्ञानाचा उपयोग ज्ञान, शिक्षण, माहिती आणि संवादासाठी व्हावा ही अपेक्षा असताना प्रत्यक्षात अनेक वेळा चुकीची माहिती, अर्धवट माहिती, अफवा आणि दिशाभूल करणारे मजकूर यांचा पूर सोशल मीडियावर दिसून येतो, त्यामुळे समाजमनात गैरसमज, तणाव आणि अनावश्यक द्वेष निर्माण होतो, विशेषतः तरुण पिढी याचा सर्वाधिक बळी ठरत आहे, एका बाजूला फेसबुकसारख्या प्लॅटफॉर्मवर हजारो डिजिटल मित्र असतानाही प्रत्यक्ष आयुष्यात संवादाची कमतरता जाणवते, कुटुंबातील सदस्यांमध्येही प्रत्यक्ष संवाद कमी होत चालला आहे, एकत्र बसून गप्पा मारणे, अनुभव शेअर करणे, संस्कारांची देवाणघेवाण होणे ही परंपरा कमी होत चालली आहे, अशा परिस्थितीत दिवसातील दोन तास तरी मोबाइल आणि टीव्हीपासून दूर राहण्याचा उपक्रम राबवणे हे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठरते, कोविड महामारीच्या काळात ऑनलाइन शिक्षणामुळे मोबाइलचे महत्त्व वाढले होते, पण त्यानंतरही त्याचा वापर नियंत्रित न राहता व्यसनाधीनतेकडे झुकताना दिसतो, जागतिक आरोग्य संघटनेच्या काही अहवालांनुसार स्क्रीन टाइम वाढल्यामुळे मुलांमध्ये लक्ष विचलित होणे, झोपेच्या समस्या, डोळ्यांचे विकार आणि मानसिक तणाव वाढण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले आहे, त्यामुळे डिजिटल साधनांचा मर्यादित आणि योग्य वापर ही काळाची गरज बनली आहे, अर्थातच २४ तासांपैकी दोन तास मोबाइल आणि टीव्ही बंद ठेवून मोठा फरक पडेल का, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो, पण या दोन तासांमध्ये वाचन, क्रीडा, कुटुंबासोबत संवाद, सर्जनशील उपक्रम किंवा स्वतःशी संवाद साधण्याची सवय लागणे हीच या उपक्रमाची खरी जमेची बाजू आहे, यामुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळू शकते, मुलांमध्ये सामाजिक जाणीव, भावनिक स्थैर्य आणि विचारशक्ती विकसित होऊ शकते, या पार्श्वभूमीवर पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते, कारण मुलांच्या सवयी घडवण्यात घरचा वातावरण निर्णायक असतो, अनेक पालक मुलांच्या हातातील मोबाइल कौशल्याचे कौतुक करतात, पण त्याच सवयीचे व्यसन झाल्यावर त्यांना नियंत्रणात आणणे कठीण जाते, त्यामुळे तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा याबाबत योग्य मार्गदर्शन देणे आणि स्वतः आदर्श घालून देणे आवश्यक आहे, शासनाच्या अशा निर्णयांमुळे जनजागृती नक्कीच होते, मात्र याची खरी अंमलबजावणी ही कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावरच प्रभावी ठरते, धाराशिव किंवा कर्नाटकातील काही गावांनी घेतलेले निर्णय हे प्रयोगाच्या स्वरूपात असले तरी त्याचे सकारात्मक परिणाम भविष्यात दिसून येण्याची शक्यता नाकारता येत नाही, आजच्या वेगवान आणि डिजिटल जगात पूर्णपणे तंत्रज्ञानापासून दूर राहणे शक्य नाही, पण त्यावर नियंत्रण ठेवणे नक्कीच शक्य आहे, म्हणूनच ‘नो टीव्ही, नो मोबाइल’ हा केवळ एक उपक्रम नसून संतुलित आणि सुदृढ जीवनशैलीकडे नेणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो, आणि जर हा विचार घराघरात रुजला, तर भविष्यात अधिक संवादशील, संवेदनशील आणि संतुलित समाज घडण्याची आशा निश्चितच बाळगता येईल.



# किलबिलाट चिमुकल्यांचा, कलागुणांना वाव देणारा प्रेरणादायी उपक्रम - भागवत

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

जि. प. प्राथ. शाळा पोखरी हवेली शाळेतील किलबिलाट चिमुकल्यांचा हा कलागुणांना वाव देणारा प्रेरणादायी उपक्रम असल्याचे मनोगत शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले. याप्रसंगी ग्रामपंचायतचे उपसरपंच सोमनाथ थिटमे, सदस्य महेश उदमले, सनी ठोंबरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन आगळे, सदस्य प्रविण गायकवाड, नंदू घुले, किरण थिटमे, सुनिता घुले, रजनीगंधा रुपवते, शुभांगी गवांदे, पूनम जगताप, दीपली वाजे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रघुनाथ गवांदे, उपाध्यक्ष नारायण कोल्हे, मच्छिन्द्र घुले, संतोष घुले, उद्योजक मंदार गुंजाळ, समाधान गोर्डे, सामाजिक कार्यकर्ते जालिंदर गागरे, वसंत गुंजाळ, संजय बागुल आदींसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘किलबिलाट चिमुकल्यांचा’ या उपक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. लहानग्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले नृत्याविष्कार आत्मविश्वासाने सादर केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि मंचावरील सादरीकरणाची भीती दूर होण्यास मदत झाली. रंगीबेरंगी वेशभूषा आणि निरागस सादरीकरणामुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले. उपस्थित पालक आणि मान्यवरांनी चिमुकल्यांच्या कौशल्याचे मनापासून कौतुक केले.

व्यासपीठ व्यवस्था सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याने केली, तर ध्वनीक्षेपक यंत्रणेसाठी ग्रामपंचायतने सहकार्य केले. गावातील सर्व संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थांनीही भरीव बक्षिसे देत आपल्या चिमुकल्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक एकनाथ साबळे, पदवीधर शिक्षक शिवाजी नरवडे, सोनाली बागुल, सुरेश साळुंके, दस्तगीर शेख, शकुंतला शेळके, सखाराम पाटील, राजेंद्र सूर्यवंशी, अंगणवाडी सेविका संजीवनी मिसाळ, जयश्री घुले, वैशाली घुले आदींनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांच्या कलागुणांना वाव दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाल्याचे मत पालकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सखाराम पाटील व सोमनाथ मदने यांनी केले. आभार प्रदर्शन शिवाजी नरवडे यांनी केले.

## संगमनेर शहरात मोकाट...पान १ वरुन

या समस्येवर तोडगा काढण्यासाठी शहरात गोशाळांची उभारणी, मोकाट जनावरांची नोंदणी, त्यांचे संगोपन व पुनर्वसन यासाठी ठोस धोरण राबवण्याची गरज व्यक्त केली जात आहे. तसेच जनावरांना अयोग्य अन्न देणार्यांवर नियंत्रण ठेवणे, शेतकर्यांना संरक्षणात्मक उपाययोजना उपलब्ध करून देणे आणि नगरपालिका प्रशासनाने विशेष मोहीम राबवून मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. एकूणच, मोकाट जनावरांचा प्रश्न हा केवळ धार्मिक किंवा भावनिक न ठेवता सामाजिक, आर्थिक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने गांभीर्याने हाताळण्याची वेळ आता आली आहे. प्रशासनाने तातडीने पावले उचलली नाहीत, तर येत्या काळात ही समस्या आणखी विकोपाला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शेख चिरागोद्दीन यांचे निधन



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

संगमनेर नगरपरिषदेचे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष शेख नूर मोहम्मद शरफोद्दीन पहिलवान यांचे पुतणे व ताजोद्दीन भय्या पहिलवान यांचे सुपुत्र शेख चिरागोद्दीन ताजोद्दीन यांचे दीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले आहे. मृत्यु समयी ते ७७ वर्षांचे होते.

समाजात त्यांचे सर्वांशी स्नेहाचे संबंध होते. विशेष म्हणजे अँग्लो उर्दू हायस्कूल, संगमनेरच्या पहिल्या बॅच १९६२ चे ते विद्यार्थी होते. १५ ऑगस्ट २०२५ ला अंजुमने इस्लाम ट्रस्टच्या वतीने त्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई असा मोठा परिवार आहे.


## जाहीर लिलाव

तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, मौजे वेल्हाळे, ता. संगमनेर येथील हनुमान मंदीराचे जुने साहित्याचा जाहिर लिलाव करण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी लिलावात सहभागी होणेसाठी समक्ष हजर राहावे.

**साहित्याचा तपशील**

**१) जुना सागवानी लाकुड** **२) लोखंडी आय बीम**

वरीलप्रमाणे साहित्याचा जाहीर लिलाव रविवार दि. १९/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. करणेत येणार आहे.

**ठिकाण – हनुमान मंदीर, वेल्हाळे, ता. संगमनेर, जिल्हा– अहिल्यानगर**

**अटी व शर्ती –**

१) लिलावात भाग घेणेसाठी अनामत रक्कम रु. ५०००/- लिलावाच्या अगोदर म्हणजे दि. १५/०४/२०२६ पर्यंत मंदीर व्यवस्थापनाकडे जमा करावी. लिलाव बोली रक्कम कमीतकमी १,११,०००/- असेल.
२)लिलाव बोली प्रक्रिया झाल्यावर लिलावाची संपुर्ण रक्कम जमा करावी लागेल त्या शिवाय लिलावातील साहित्य ताब्यात दिले जाणार नाही.
३) लिलाव घेतल्यावर ०७ दिवसात साहित्य ताब्यात घ्यावे लागेल
४) अनामत रक्कम न भरलेल्या व्यक्तीस लिलावात बोली लावता येणार नाही.
५) ज्या व्यक्तीने अनामत रक्कम भरली आहे त्यांची रक्कम लिलाव झाल्यावर दुसऱ्या दिवशी परत दिली जाईल.
६)मटेरियल खोलून नेण्याची जबाबदारी ही लिलाव घेणाऱ्याची असेल

**संपर्क –**
**गणेश सोनवणे – ९६३७६६४००९**
**ज्ञानेश्वर गुळवे – ९८३४४११७५२**
**भारत सोनवणे – ९७६७३५४२४१** (हनुमान मंदीर बांधकाम समिती)



**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ जन्म नोंद/५२९/२०२६

दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
संगमनेर, दिनांक – २३/०३/२०२६

## जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. याकुब इब्राहीम तांबोळी, रा. चिंचोली गुरव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०२/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. चिंचोली गुरव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे याकुब इब्राहीम तांबोळी यांचा जन्म मौजे चिंचोली गुरव, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०१/०६/१९६९ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी चिंचोली गुरव, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी चिंचोली गुरव, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**



**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी


महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५



युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता



**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची








卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐

MALPANI **मालपाणी उद्योग समूह** आयोजित

**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**

रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर

- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण–गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

**सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा**

नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक

**विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!**

संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर

श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)



**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
AFARIN ANWAR BAGWAN
TO NEW NAME AS
AFREEN ISLAM BAGWAN
ADRESS- GHAR NO - 1283, BAGWANPURA, TAL - SANGAMNER, 422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
AADIL SHAKIL MOMIN
TO NEW NAME AS
ADIL SHAKIL MOMIN
ADD – BADI MASJID SAMOR, MOMINPURA , SANGAMNER, TAL - SANGAMNER, DIST- AHMEDNAGAR

## जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०२ जागा
टॅली कोर्स
ड्रायव्हर - ३ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
9370071777
9822791484

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7030125701

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे – ०२ जागा (गाडी व लायसन्स पाहिजे)
दुकानकामासाठी डिलीव्हरी बॉय पाहिजे – ०२ जागा
9766921306

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी ॲग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला,वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत ‘दैनिक युवावार्ता व्यवस्थापन’ हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# संगमनेर येथील अध्यापक विद्यालयाकडून 'कन्या सुरक्षा' चा जागर

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
शिक्षण प्रसारक संस्थेच्या अध्यापक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून संगमनेर तालुक्यातील विविध शाळेत कन्या सुरक्षा या विषयावर पथनाट्य सादर केले. कन्या सुरक्षा व सामाजिक स्थितीवर भाष्य करून मुलीच्या सुरक्षेवर पथनाट्यातून सामाजिक जबाबदारीची जाणीव या माध्यमातून मांडण्यात आली. या पथनाट्य निमज, नांदुरी व चिखली येथील शाळेत करण्यात आले. या प्रसंगी निमज येथील भारतरत्न राजीव गांधी विद्यालयाचे प्राचार्य अविनाश कानवडे, नांदुरी येथील प्राचार्य प्रमोद देशमुख व चिखली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील प्राचार्य दत्तात्रय कर्पे यांसह अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्या सविता घुले उपस्थित होते.

या संदर्भात माहिती अशी की, आजच्या सोशल मीडिया व बदललेल्या परिस्थितीचा विचार करून मुली व महिलांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शालेय स्तरावर या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी या पथनाट्यच्या माध्यमातून कन्या सुरक्षेचा जागर करण्यात येत असल्याची माहिती उपक्रमाचे समन्वयक प्रा. सीमा कासार यांनी सांगितले. या पथनाट्य सादरीकरणामध्ये अध्यापक विद्यालयातील छात्र प्रशिक्षणार्थी पूजा मोकळ, ऋतुजा इल्हे, सायली कडलग, प्रेरणा मिसाळ, प्रीती मोहिते, भक्ती आहेर, प्राजक्ता देवके, तजिन सय्यद या विद्यार्थिनींनी अभिनय केला.

या प्रसंगी प्राचार्या सविता घुले मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनातून मुलींनी निर्भयपणे शिक्षण घेऊन स्वतःची सुरक्षा करण्यास सक्षम होण्याचे आवाहन केले. प्रा. कविता भोकनळ मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनातून समाजातील सध्याच्या असुरक्षित वातावरणाबद्दल चिंता व्यक्त केली, अशा परिस्थितीत मुलींनी केवळ सुशिक्षित न होता सुरक्षित राहण्यासाठी सजग असणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे संयोजक प्रा. सीमा कासार, प्रा. प्रणित धिवर, प्रा. आकाश लकारे, प्रा. चंद्रकला सापनर व प्राध्यापक विद्या भवर यांचेही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. यावेळी मोठ्या संख्येने शिक्षक प्रशिक्षणार्थी व शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# संगमनेरच्या भक्तीशक्ती रायडर्सचा सायकल महाकुंभ २०२६ मध्ये दणदणीत विजय



संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)-
रॉयल रायडर्स यांच्या वतीने आयोजित 'सायकल महाकुंभ २०२६' या भव्य व्हर्च्युअल सायकलिंग स्पर्धेत संगमनेरच्या भक्तीशक्ती रायडर्स संघाने उल्लेखनीय कामगिरी करत टॉप रायडर्सचा मान पटकावला आहे.

दि. १ मार्च २०२६ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत नाशिक येथील डॉ. आबा पाटील यांच्या टीमने या सायकल महाकुंभाचे आयोजन केले होते. स्पर्धेत प्रत्येक ४ सदस्यांच्या टीमसाठी २४२४ किमी अंतर पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. मात्र संगमनेरच्या भक्तीशक्ती रायडर्स संघाने हे लक्ष्य मोठ्या फरकाने पार करत तब्बल १२,७३१ किमी अंतर पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या विजयी संघात डॉ. विश्वनाथ इंगळे, सचिन कानवडे, अविनाश वाकचौरे आणि भाऊसाहेब बोंबले यांचा समावेश होता. त्यांच्या या दमदार कामगिरीमुळे संगमनेरच्या नावाला राज्यस्तरावर मोठा मान मिळाला आहे.

या यशस्वी स्पर्धेचा गौरव सोहळा दि. ५ एप्रिल २०२६ रोजी नाशिक येथे उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके, विशेष अतिथी म्हणून सुजित नेवसे (म.व.से.), तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. प्रवीणकुमार खाविया (संचालक, खाविया ग्रुप) उपस्थित होते. प्रायोजक डॉ. आबा पाटील यांच्या हस्ते विजेत्या संघाचा सन्मान करण्यात आला.

रॉयल रायडर्स परिवाराने आयोजित केलेल्या या सायकल महाकुंभामुळे फिटनेस व पर्यावरण जनजागृतीला मोठा हातभार लागला असून, युवकांमध्ये सायकलिंगबद्दल नवचैतन्य निर्माण झाले आहे. संगमनेरच्या भक्तीशक्ती रायडर्सच्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दिंडोरी अपघातातील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ४५ लाखांची मदत




मुंबई ()-
नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील शिवाजीनगर येथे ३ एप्रिल २०२६ रोजी घडलेल्या दुर्दैवी अपघातात एकाच कुटुंबातील ९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. घटनेची दखल घेऊन मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने मदत देण्याचे निर्देश दिले होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख, याप्रमाणे एकूण ४५ लाख रुपये आर्थिक मदत मंजूर करण्यात आली असून, रक्कम जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

इंदोरे गावातील एकाच कुटुंबातील सदस्य प्रवास करत असलेल्या वाहन विहिरीत पडल्याने हा अपघात घडला. मृतांमध्ये रेश्मा सुनील दरगोडे, आशा अनिल दरगोडे, खुशी अनिल दरगोडे, श्रेयस अनिल दरगोडे, राखी सुनील दरगोडे, श्रावणी अनिल दरगोडे, समृद्धी राजेंद्र दरगुडे, माधुरी अनिल दरगोडे व सुनील दत्तू दरगोडे यांचा समावेश आहे.

या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत. गरजू नागरिकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीबाबत अधिक माहितीसाठी टोल-फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## अहिल्यानगरमध्ये भोंदुगिरिविरोधात...

पान नं. ०१ वरुन

फलज्योतिष व बुवाबाजीच्या नावाखाली फसवणूक करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी. तसेच, अशोक खरातसारखी प्रकरणे जिल्ह्यातही असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने जिल्हा व तालुका पातळीवर व्यापक तपास मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. हे प्रकरण केवळ एका गुन्ह्यापुरते मर्यादित नसून समाजातील अंधश्रद्धा, महिलांवरील अत्याचार आणि कायद्याच्या गैरवापराशी संबंधित असल्याने यावर दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. दरम्यान, अंधश्रद्धा निर्मूलन समितीने प्रशासनासोबत समन्वयाने काम करण्याची तयारी दर्शवली असून भोंदूगिरीच्या विरोधात निर्णायक कारवाई करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# अकोले येथे 'शिव-फुले-शाहू-आंबेडकर' व्याख्यानमाला

अकोले (प्रतिनिधी) -
अकोले येथे दि. ११ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान मान्यवर व्याख्यात्यांच्या उपस्थितीत 'शिव-फुले-शाहू-आंबेडकर' व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानमालेची सुरुवात ज्येष्ठ पत्रकार व रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते पी. साईनाथ यांच्या व्याख्यानाने होणार असून ते 'शेती आणि शेतकऱ्यांसमोरील आव्हाने' या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. ११ एप्रिल रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. बबनराव महाले तर स्वागताध्यक्ष प्रा. बाळासाहेब मेहेत्रे राहणार आहे. १२ एप्रिल रोजी कवी डॉ. स्वप्नील चौधरी 'चल दंगल समजूत घेऊ या विषयावर कवितांचो कार्यक्रम सादर करणार आहेत आहेत. अध्यक्षस्थानी विवेक महाराज केदार असून अकोले तालुका मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सखाराम घनकुटे स्वागताध्यक्ष असतील. तिसऱ्या दिवशी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार शामसुंदर सोत्रर महाग्रम 'समतेची शिकवण देणारा वारकरी संप्रदाय आणि आजचा महाराष्ट्र' या विषयावर प्रर्गिदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी संपत महाराज भोर तर स्वाप्रताध्यक्ष डॉ. भाऊराव महारान उघडे हे राहणार आहे.

१४ एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जर्मतीनिमित्त 'संघम् शरणम् गच्छामी' हे त्यांच्या जीवन कार्यावर आधारित महानाट्य सादर केले जाणार आहे. हैदराबाद येथील अभ्युदय कला अकादमीचा २१ कलाकारांचा संच हे नाट्य सादर करणार असून या महानाट्याचे देशभरात ८०० हून अधिक प्रयोग झाले आहेत. या नाट्यात प्रसिद्ध अभिनेते जग्गाराजू यांनी डॉ. आंबेडकर यांची भूमिका साकारली आहे. महानाट्यापूर्वी डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षस्थानी विजयराव वाकचौरे तर आयाज शेख स्वागताध्यक्ष असतील तर आ. डॉ. किरण लहामटे यांची प्रमुख उपस्थिती असेल. यावेळी पुस्तक प्रदर्शन आणि विक्री स्टॉल असेल. व्याख्यानापूर्वी समतेची गाणी होतील. शहरातील व तालुक्यातील नागरिकांनी या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. व्याख्यानमालेच्या यशस्वितेसाठी संयुक्त जयंती महोत्सव समिती, बळीराजा अभ्यास मंडळ, छात्रभारती, राष्ट्र सेवा दल, समता परिषद, इप्टा, साथी अमृतभाई मेहता प्रतिष्ठान, व्यापारी असोसिएशन, केमिस्ट-ड्रगिस्ट असोसिएशन, शिक्षक संघटना, प्राध्यापक संघटना तसेच विविध समविचारी संस्था व संघटना प्रयत्नशील आहेत.

# लाँग मार्चमधील मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी अकोलेत वाहन जत्था

अकोले
राजुर ते निझरणेश्वर लाँग मार्चमध्ये मान्य करण्यात आलेल्या मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, किसान सभा, सी. टू. कामगार संघटना व डी. वाय. एफ. आय. युवक संघटनेच्या वतीने शेंडी येथे तीव्र निदर्शने करून ५८ किलोमीटर वाहन जत्था काढण्यात आला. भंडारदरा धरणाला १०० वर्षे पूर्ण होत असून, सरकारच्या वतीने भंडारदरा शताब्दी वर्ष साजरे करण्याची जोरदार तयारी सुरू करण्यात आली आहे. मात्र, जसे धरणाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत, तसेच येथील आदिवासींच्या विस्थापनालाही शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या शंभर वर्षांमध्ये या आदिवासींना अजूनही विस्थापनाच्या मोबदल्यात मिळालेल्या जमिनीचा वर्ग एकचा मालकी ताबा मिळालेला नाही. अद्यापही परिसरातील शेतकरी भंडारदर्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. किसान सभेने या मागण्यांवर सातत्याने संघर्ष केला आहे.



नुकत्याच निघालेल्या लाँग मार्चमध्ये या मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या. त्यांच्या अंमलबजावणीची आठवण करून देण्यासाठी शेंडी येथे तीव्र निदर्शने करण्यात आली. परिसरातील व तालुक्यातील मोठ्या संख्येने शेतकरी यामध्ये सहभागी झाले. शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीची मागणी मान्य करूनही अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाही. पेसा मोबिलायझरची पदे अचानक कमी करून अनेकांना कामावरून काढून टाकण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आशा कर्मचाऱ्यांचा गेले सहा महिन्यापासून पगार दिलेला नाही. परिसरात वीज व पिक विम्याचे प्रश्न प्रलंबित आहेत. रतनवाडी व खडकी बुद्रुक येथील जलजीवन योजनेचे प्रश्न गंभीर झाले आहेत. घाटघर येथील पुनर्वसित शेतकऱ्यांच्या घरामध्ये सांडपाणी घुसून आरोग्याचे मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. परिसरातील या व इतर मागण्यांसाठी ही निदर्शने करण्यात आली.

जलसंपदा विभागाच्या कार्यालयावर झालेल्या निदर्शनामध्ये आदिवासींच्या वरील मागण्या मान्य न झाल्यास शताब्दी कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा देण्यात आला. यानंतर भंडारदरा येथील राघोजी भांगरे यांच्या पुतळ्याला पुष्पाहार अर्पण करून जथ्याची सुरुवात करण्यात आली. मुतखेल, कोलटेंभे, रतनवाडी, साम्रद, घाटघर, शिंगणवाडी, पांजरे इत्यादी परिसरातील सर्व गावांमधून वाजत गाजत शेकडो शेतकऱ्यांनी आपल्या सोबत आणलेल्या वाहनांमधून आपल्या मागण्यांची जनजागृती करत जत्था यशस्वी केला. मुरशेत येथे रात्री साडेअकरा वाजता प्रचाराची सांगता झाली. डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, तुळशीराम कातोरे, एकनाथ मेंगाळ, राजाराम गंभीरे, अर्जुन गंभीरे, संगीता साळवे, हेमलता शेळके, गणपत मधे आदींनी सहभाग घेतला.

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर,
यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५३०/२०२६
संगमनेर, दिनांक - २४/०३/२०२६

जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. फरीदा अब्दूलकरीम सय्यद, रा. आंबी खालसा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २४/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. आंबी खालसा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे सय्यद फरीदा करीम, यांचा जन्म मौजे आंबी खालसा, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक १०/०७/१९७८ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी आंबी खालसा, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी आंबी खालसा, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर,
यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/५३१/२०२६
संगमनेर, दिनांक - २४/०३/२०२६

जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. इरफान अब्दूलकरीम सय्यद, रा. आंबी खालसा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २४/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. आंबी खालसा, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे सय्यद इरफान अब्दूलकरीम, यांचा जन्म मौजे आंबी खालसा, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०१/०६/१९८२ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी आंबी खालसा, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी आंबी खालसा, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

तहसिलदार संगमनेर

# 'मिलियनियर मायग्रेशन'... अर्थव्यवस्थेला लागलेली गळती

भारतातील आर्थिक प्रगतीची चर्चा जगभर होत असताना एक वेगळी आणि गंभीर प्रवृत्ती शांतपणे डोके वर काढताना दिसते आहे, ती म्हणजे 'मिलियनियर मायग्रेशन'-अतिश्रीमंत भारतीयांनी देश सोडून परदेशात स्थायिक होण्याची वाढती प्रवृत्ती. ही केवळ आकडेवारी नाही, तर देशाच्या नागरी व्यवस्थेवर, आर्थिक धोरणांवर आणि जीवनमानावर उभा राहणारा मोठा प्रश्न आहे. भारतातून संपत्ती, कौशल्य आणि भांडवल यांचे बाहेर जाणे म्हणजे दीर्घकालीन विकासाच्या दृष्टिकोनातून चिंतेचा विषय ठरतो. गेल्या काही वर्षांत या प्रवाहात वाढ झाली असून, आगामी काळात तो अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक अभ्यास आणि सर्वेक्षणांनुसार, उच्च निव्वळ संपत्ती असलेल्या भारतीयांपैकी मोठा टक्का परदेशात स्थलांतराचा गंभीर विचार करत आहे.



ही प्रवृत्ती केवळ भारतापुरती मर्यादित नाही. चीन, युनायटेड किंगडम, रशिया, ब्राझील, दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांमधूनही श्रीमंत लोक मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करत आहेत. मात्र भारताच्या संदर्भात याचे वेगळे महत्त्व आहे, कारण भारत हा वेगाने वाढणारा आणि मोठी अर्थव्यवस्था असलेला देश आहे. अशा परिस्थितीत देशातील संपन्न वर्गानेच बाहेर जाण्याचा पर्याय निवडणे हे धोरणकर्त्यांसाठी धोक्याचे संकेत आहेत. संयुक्त अरब अमिराती, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, सिंगापूर, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, स्वित्झर्लंड यांसारखी देशे या स्थलांतरासाठी आकर्षण ठरत आहेत. या देशांमध्ये करसवलती, उत्तम पायाभूत सुविधा, उच्च जीवनमान आणि सुरक्षित वातावरण या गोष्टी सहज उपलब्ध असल्यामुळे भारतीय श्रीमंतांचा ओढा तिकडे वाढत आहे.

भारतातून श्रीमंत का निघून जात आहेत, याचा विचार केला तर अनेक कारणे समोर येतात. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे शहरी जीवनमानातील घसरण. मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, पुणे, चेन्नई, हैदराबाद यांसारखी शहरे आर्थिकदृष्ट्या प्रबळ असली तरी जीवनाच्या गुणवत्तेच्या बाबतीत अनेक समस्या झेलत आहेत. खड्डेमय रस्ते, प्रचंड वाहतूक कोंडी, प्रदूषण, अस्वच्छता, पूरस्थिती, अपुरी नागरी सुविधा या सर्व बाबी दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. अतिश्रीमंत व्यक्तींना त्यांच्या आलिशान घरांच्या बाहेर पडताच या समस्यांना सामोरे जावे लागते, आणि त्यामुळे त्यांना परदेशातील नियोजित, स्वच्छ आणि सुसज्ज शहरांची तुलना अधिक आकर्षक वाटते.

यासोबतच आरोग्य, शिक्षण आणि व्यावसायिक संधींचा मुद्दाही महत्त्वाचा ठरतो. परदेशातील उच्च दर्जाची आरोग्य सेवा, जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था आणि सुलभ व्यवसाय वातावरण या गोष्टी भारतीय श्रीमंतांना आकर्षित करतात. विशेषतः 'झिरो-टॅक्स' किंवा कमी कररचना असलेले देश, जसे की संयुक्त अरब अमिराती, हे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर पर्याय म्हणून समोर येतात. तसेच जागतिक व्यवसाय नेटवर्क्सशी जोडले जाणे, गुंतवणुकीसाठी अधिक संधी आणि स्थिर धोरणात्मक वातावरण या कारणांमुळेही स्थलांतराची प्रवृत्ती वाढत आहे.

भारतीय शहरांमधील व्यवस्थात्मक त्रुटी हा या समस्येचा केंद्रबिंदू आहे. शहरांचे नियोजन, प्रशासन आणि आर्थिक व्यवस्थापन यामध्ये असलेली कमकुवतता स्पष्टपणे दिसून येते. वाढत्या लोकसंख्येनुसार पायाभूत सुविधा उभारण्याची क्षमता कमी पडते आहे. हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना-जसे की पूर, उष्णतेच्या लाटा-तोंड देण्यासाठी शहरांची तयारी अपुरी आहे. या पार्श्वभूमीवर, जे लोक आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत ते पर्याय शोधत आहेत आणि परदेशात जाण्याचा निर्णय घेत आहेत.

या परिस्थितीत 'खाजगी शहरे' किंवा विशेष प्रशासन क्षेत्रांची संकल्पना एक पर्याय म्हणून पुढे येत आहे. ही शहरे आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुविधा आणि जीवनमान देण्याच्या उद्देशाने विकसित केली जाऊ शकतात. विशेष आर्थिक क्षेत्रांप्रमाणेच, अशा शहरांमध्ये वेगळे प्रशासन, कररचना आणि नियोजन पद्धती लागू करता येऊ शकतात. या शहरांचा खर्च रहिवाशांकडून उचलला जाईल आणि त्यांचे संचालन व्यावसायिक पद्धतीने केले जाईल. यामुळे उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता आणि कार्यक्षम सेवा उपलब्ध होऊ शकतील.

अर्थात, ही संकल्पना सर्व समस्यांचे उत्तर नाही. अशा शहरांमुळे सामाजिक विषमता वाढण्याची शक्यता आहे, कारण ती प्रामुख्याने उच्चभ्रू वर्गासाठीच उपलब्ध राहतील. मात्र, जर यामुळे भांडवल आणि प्रतिभेचे देशाबाहेर जाणे थांबवता आले, तर त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेला फायदा होऊ शकतो. याशिवाय, या प्रयोगातून पारंपरिक शहरांच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठीही प्रेरणा मिळू शकते.

शेवटी, 'मिलियनियर मायग्रेशन' ही केवळ श्रीमंतांची कथा नाही, तर ती देशाच्या विकास मॉडेलचा आरसा आहे. जर देशातील सर्वाधिक सक्षम आणि संपन्न वर्गच बाहेर जाण्याचा विचार करत असेल, तर त्यामागील कारणांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधा, नागरी नियोजन, आरोग्य, शिक्षण आणि प्रशासन यामध्ये व्यापक सुधारणा केल्याशिवाय ही प्रवृत्ती थांबणार नाही. भारताने जर आपली आर्थिक प्रगती टिकवायची असेल, तर केवळ वाढीच्या आकडेवारीवर नव्हे तर जीवनमानाच्या गुणवत्तेवरही तितकाच भर द्यावा लागेल. तेव्हाच 'मिलियनियर मायग्रेशन' ही चिंता न राहता विकासाच्या प्रवासातील एक तात्पुरती अडचण ठरेल.

पॅनल देणे आहे

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ........ 05
सेल्सगर्ल........ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर........ 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# अमृतवाहिनी बँकेकडून 1200 कोटींच्या व्यवसायाची वाटचाल कौतुकास्पद – मा. मंत्री बाळासाहेब थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- बँकिंग व्यवसाय हा अत्यंत काळजीचा विषय आहे. बँकिंग मध्ये ग्राहक आणि नागरिकांचा विश्वास जपणे महत्त्वाचे असते. अमृतवाहिनी सहकारी बँकेने आपल्या चांगल्या कामातून हा विश्वास सार्थ ठरवला आहे. सर्व आधुनिक प्रणालींचा वापर करून ग्राहकांना चांगल्या सुविधा देत बँकेने १२०० कोटींचा केलेल्या व्यवसाय हा कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या बिझनेस समिट २०२६ या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मा. आ. डॉ. सुधीर तांबे, बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, व्हाईस चेअरमन ॲड. नानासाहेब शिंदे, बाबासाहेब ओहोळ, रामहरी कातोरे, अजय फटांगरे, शरद नाना थोरात, बापूसा टाक, संचालक अविनाश सोनवणे, अण्णासाहेब शिंदे, ॲड. लक्ष्मण खेमनर, बाळासाहेब वाळके, बापूसाहेब गिरी, श्रीमती ललिता दिघे, विवेक तांबे, राजू गुंजाळ, ॲड शिवाजीराव दिघे, सौ सुलभाताई दिघे, विष्णुपंत रहाटळ, मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराती यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी सेवानिवृत्त शाखा व्यवस्थापक रमेश पवार यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. याचबरोबर उत्कृष्ट काम करणाऱ्या १० अधिकाऱ्यांचाही सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, अमृतवाहिनी बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी,कर्मचारी या सर्वांनी एकत्रितपणे चांगले काम केल्याने बँकेचे हे यश आहे. बँकेमध्ये ७०६ कोटींच्या ठेवी असून बँकेने एकूण १२०० कोटींचा केलेला व्यवसाय हा अत्यंत कौतुकास्पद आहे. बँकिंग मध्ये कर्ज वितरण ही अवघड बाब आहे. याचबरोबर कर्ज वसुली होणेही अत्यंत महत्त्वाचे आहे.

संगमनेर तालुक्यातील बँकांमधून सुमारे १० हजार कोटींच्या ठेवी असून हे चांगले अर्थव्यवस्थेचे लक्षण आहे. या ठेवींमधून अर्थव्यवस्थेला गती मिळाली आहे. बिनचूक काम होण्याकरता आयएसओ प्रणालीसह बँकेने डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध करून दिले आहेत. नवीन एआय तंत्रज्ञान आले असून जे जे नवीन आहे ते बँकेने स्वीकारले आहे. अनेक ठिकाणी बँका आणि पतसंस्था कोसळल्या आहेत. चुकीचे काही घडणे हे चांगले नाही. बँकिंग मध्ये विश्वास ही गोष्ट महत्त्वाची आहे. आणि तो विश्वास सार्थ करणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असते. अमृतवाहिनी बँकेने कायम चांगल्या गुणवत्तेबरोबर ग्राहकांचा विश्वास जपला आहे.

तर मा. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेरचा सहकार हा देशाला दिशादर्शक ठरला आहे. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी बँकिंग मध्ये मोठे काम केले असून अनेक वर्षे ते जिल्हा बँकेचे चेअरमन व संचालक होते. याचबरोबर राज्य सहकारी बँकेचे चेअरमन पद ही त्यांनी भूषवले. आर्थिक शिस्त,प्रामाणिकपणा याला प्राधान्य दिले. सहकारातून तालुक्यात समृद्धी निर्माण झाली असून सहकाराला प्रथम प्राधान्य प्रत्येकाने दिले पाहिजे. बँकिंग व्यवसायाला दरवर्षी ऑडिट असून बँकेची वाटचाल ही अत्यंत उत्कृष्ट असल्याचे ते म्हणाले.

तर चेअरमन सुधाकर जोशी म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी बँकेने १२०० कोटींचा व्यवसायाचा टप्पा पार केला असून यावर्षी २२.२ टक्के गतीने वाढ झाली आहे. ढोबळ नफा ११ कोटी १७ लाख रुपये असून निवड नफा ८ कोटी १ लाख रुपये आहे. तर नेट एनपीए ० टक्के आहे. बँकेच्या ११ शाखा कार्यरत असून ट्रेझरी मधून ५२ लाख रुपयांचा नफा बँकेला मिळाला आहे. ग्राहकांचा विश्वास आणि प्रेम याचबरोबर डिजिटल प्लॅटफॉर्म मधून दररोज किमान दीड ते दोन कोटींचे व्यवहार होत असून १ वर्षात ५०० कोटींचा डिजिटल ट्रांजेक्शन होत असल्याचे ते म्हणाले. येणाऱ्या वर्षांमध्ये ५ शाखा नवीन शाखा सुरू होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# संगमनेर नगरपरिषदेत जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी नागरिकांची अडवणूक

## शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपरिषदेकडून जन्म व मृत्यू दाखले देताना नागरिकांना विनाकारण त्रास दिला जात असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेच्या वतीने करण्यात आला आहे. यासंदर्भात मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली.

शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जन्म दाखला मिळवितांना नागरिकांकडून अनावश्यक कागदपत्रांची मागणी केली जाते. विशेषतः १०० रुपयांच्या स्टॅम्पवर अफिडेव्हिट सादर करण्यास भाग पाडले जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार १५ वर्षांपर्यंतच्या मुलांच्या जन्मदाखल्यासाठी कोणत्याही प्रकारचे अफिडेव्हिट घेऊ नये, असा जीआर अस्तित्वात असतानाही संबंधित अधिकारी व कर्मचारी नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असून, अनेक तक्रारी करूनही प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शिवसेनेने प्रशासनाकडे काही ठोस मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करणे, नागरिकांकडून केवळ स्वयंघोषणापत्र घेऊन दाखले देणे, तसेच नागरिकांना स्पष्ट माहिती मिळावी यासाठी नगरपरिषदेत मोठा सूचना फलक लावणे या मागण्यांचा समावेश आहे.

दरम्यान, प्रशासनाने या बाबीकडे तातडीने लक्ष न दिल्यास शिवसेनेच्या वतीने संगमनेर नगरपरिषदेविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. या निवेदनावर माजी नगरसेवक कैलास वाकचौरे, बाळासाहेब डावखरे, समीर ओझा, भैय्या तांबोळी, अविनाश थोरात, शशी घोलप, अमित पवार, कृष्णा केसेकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. या प्रकरणाची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार अमोल खताळ, तसेच जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व तहसीलदार संगमनेर यांनाही देण्यात आली आहे.

# हिवरगाव आंबरे येथे मुख्याध्यापक गुंजाळ यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा; मान्यवरांचा होणार सन्मान

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ, संगमनेर (सी/ओ निमगाव बु||) संचलित न्यू इंग्लिश स्कूल, हिवरगाव आंबरे (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) येथे मुख्याध्यापक गुंजाळ मधुकर कारभारी हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत असून, त्यांच्या सेवापूर्ती निमित्त भव्य गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.



रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता हा कार्यक्रम उत्साहात संपन्न होणार असून, यावेळी गुंजाळ यांच्यासह रेवगडे मधुकर विष्णू (माजी मुख्याध्यापक), कानवडे रमेश रामकृष्ण (मुख्याध्यापक), भागवत पांडुरंग मारूती (माजी मुख्याध्यापक), बोऱ्हाडे विलास बाळकृष्ण (सहशिक्षक), कानवडे भारत आत्माराम (सहशिक्षक), येंधे दिलीप भावका (कनिष्ठ लिपीक) आणि वाकचौरे अशोक भगवंता (कर्मचारी) या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामकृष्ण नानाजी भांगरे (अध्यक्ष, ज्ञानोदय शिक्षण प्रसारक मंडळ) राहणार असून, श्रीमती उज्वलाताई रामचंद्र कानवडे (सचिव) यांच्या शुभहस्ते कार्यक्रम पार पडणार आहे. तसेच श्रीकृष्ण रेवजी पवार (उपाध्यक्ष), संतोष प्रताप नेहे (सहसचिव), प्रशांत बाळासाहेब कानवडे (खजिनदार), आबासाहेब भाऊसाहेब ठाणगे (सदस्य), श्रीमती निशा शिवाजी कानवडे (सदस्या) आणि धनंजय रामकृष्ण भांगरे (सदस्य) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, अकोले विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. किरणजी लहामटे, विधानपरिषद सदस्य सत्यजितदादा तांबे तसेच एकविरा फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांची उपस्थिती लाभणार आहे.

यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध वक्ते प्राचार्य प्रदीपजी कदम (संस्थापक अध्यक्ष, मानवता प्रतिष्ठाण) यांचे व्याख्यान होणार असून, कार्यक्रमाला परिसरातील शिक्षक, विद्यार्थी, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

INVOFIX SOLUTION PVT. LTD.
साठी खालील जागा भरणे आहे
JOB VACANCY
मार्केटिंग १० जागा
टेली कॉलिंग १० जागा
सेल्स ऑफिसर ०५ जागा
ड्रायव्हर ०२ जागा
अनुभवास प्राधान्य आकर्षक पगार दिला जाईल
- पत्ता -
श्री स्वामी समर्थ एजन्सी,
स्वागत मंगल कार्यालयासमोर अकोले बायपास रोड संगमनेर
- संपर्क -
7030334486
7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग
• मधुमेह व हृदयरोग
• दमा व श्वसनाचे विकार
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
• जनरल सर्जरी
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
• किडनी विकार
• मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• सर्पदंश व विषबाधा
• बालरोग चिकित्सा विभाग
• प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25